**बारामती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एमईडी-२०१३/प्र.क्र.२१२/१३/शिक्षण-१**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन संकुल, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक रोड, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ०५ जुलै, २०१९.

**वाचा :**
१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी-२०१०/प्र.क्र.१८७/२०१२/शिक्षण-१, दिनांक ३ जानेवारी, २०१३.
२) भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. MCI-३४(४१)(E-३१)/२०१९-Med./१२०१२०, दिनांक ३० मे, २०१९ .

**प्रस्तावना :**

बारामती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व ५०० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरु करण्यास संदर्भाधीन क्रमांक (१) च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या वैद्यकीय महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (२) अन्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून परवानगी दिलेली आहे. सबब, सदर महाविद्यालयास १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या वैद्यकीय महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (२) अन्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर वैद्यकीय महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १०० एवढी राहील.
२) सदर अभ्यासक्रमास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण प्राप्त करुन घेण्यात यावे व तद्नंतर प्रवेश करण्यात यावेत.
३) राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

४) केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

६) केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०१९-२० वर्षाकरिता असून तद्नंतर सदर परवानगीचे दरवर्षी नुतनीकरण करुन घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्याआधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

७) सदर शासन निर्णय हा केंद्र शासनाने संदर्भाधीन क्र. (२) अन्वये दिलेली परवानगी तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७०५१२३१२२३३१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MEDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2019.07.05 16:25:40 +05'30'

(सुरेन्द्र चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव , राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण, यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालय, आयुष संचालनालय, मुंबई,
८. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, पुणे.
९. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, बारामती, पुणे.
१०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, बारामती, पुणे.

१२. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये.

१३. सर्व अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालये.

१४. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती/ शिक्षण शुल्क समिती, २०५ गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१,

१५. सर्व उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवड नस्ती (शिक्षण १).